

## खडसे, श्री. एकनाथराव गणपतराव
## मा. विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा

| | | |
|---|---|---|
| **जन्म** | : | १ जून १९५२. |
| **जन्म ठिकाण** | : | कोथळी, तालुका मुक्ताईनगर, जिल्हा जळगाव. |
| **शिक्षण** | : | बी. कॉम. |
| **ज्ञात भाषा** | : | मराठी, हिंदी व इंग्रजी. |
| **वैवाहिक माहिती** | : | विवाहित, पत्नी श्रीमती मंदाकिनी. |
| **अपत्ये** | : | एकूण ३ ( एक मुलगा व दोन मुली). |
| **व्यवसाय** | : | शेती. |
| **पक्ष** | : | भारतीय जनता पक्ष. |
| **मतदारसंघ** | : | २०-मुक्ताईनगर, जिल्हा जळगाव. |
| **इतर माहिती** | : | १९८३-९५ मानद सचिव, एदलाबाद तालुका एज्युकेशन सोसायटी; १९९० ते १९९५ पुणे विद्यापीठ सिनेट सदस्य; २००२ पासून महात्मा फुले कृषि विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य; १९८०-१९९० चेअरमन, तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ; १९९७-२००२ पासून संचालक, जळगाव जिल्हा मध्यवर्ती बँक; १९८२ पासून कार्यकारिणी सदस्य, मुक्ताईनगर तालुका एज्युकेशन सोसायटी; १९८५-९५ संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती, बोदवड; १९८९-९५ चेअरमन, मुक्ताई क्रेडिट सहकारी संस्था मुक्ताईनगर; १९७८-८८ चेअरमन, जयकिसान पीक संरक्षण सहकारी संस्था.; १९८३-९५ चेअरमन, मुक्ताई औद्योगिक तेलबिया उत्पादक सहकारी संस्था; १९८०-९० संचालक, मुक्ताई औद्योगिक सहकारी संस्था; १९८०-२००५ संचालक, विविध |

कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी, कोथळी; १९८५-९० संचालक, भुसावळ पिपल्स सहकारी बँक; १९८४-८७ सरपंच, ग्रामपंचायत, कोथळी व १९८२ ते १९९० सदस्य, पंचायत समिती, मुक्ताईनगर; १९९८ संस्थापक-चेअरमन, मुक्ताई सहकारी सूत गिरणी, मुक्ताईनगर; १९८०-८५ भाजपा तालुका उपाध्यक्ष; १९९१-९५ जळगाव जिल्हा भाजपा अध्यक्ष; १९९९-२००४ सरचिटणीस, भाजपा महाराष्ट्र प्रदेश; २००४ पासून अखील भारतीय भाजपाचे कार्यकारिणी सदस्य; १९९०-९५, १९९५-९९, १९९९-२००४, २००४-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, १९९०-९५ प्रतोद, भाजपा विधिमंडळ पक्ष; १९९०-९१ सदस्य, सदस्यांचे वेतन व भत्ते संयुक्त समिती; १९९१-९२, २००५-०७ आणि २००७-०९ सदस्य, लोकलेखा समिती; १९९३-९४ सदस्य, सार्व. उपक्रम समिती; १९९५ समिती प्रमुख, पंचायत राज समिती; १९९५-९६ व १९९६-९७ सदस्य, वेतन व भत्ते व निवृत्तीवेतनाबाबत संयुक्त समितीचे वित्तमंत्री म्हणून पदसिद्ध प्रमुख; १९९५-२००९ विधिमंडळाच्या विधेयकांसंबंधीच्या संयुक्त समित्यांवर सदस्य; २००२-०३ समिती प्रमुख, ग्रामविकास, जलसंधारण व पाणीपुरवठा स्थायी समिती; २००२ सदस्य, नाफेड संदर्भातील विधिमंडळातील तदर्थ समिती; २००३-०४ व २००७ पासून गटनेता, भाजपा, महाराष्ट्र विधानसभा; २००२-२००४ व २००५ ते ०७ उपनेता, भाजपा विधिमंडळ पक्ष; २००३-०४, २००७-०९ पासून सदस्य विधानसभा कामकाज सल्लागार समिती; २००७ सदस्य, प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न संबंधित सदस्यांनी मागे घेण्यासंदर्भातील विधीमंडळाची विशेष समिती; नोव्हेबर २००९ पासून उपाध्यक्ष, राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा; जून १९९५ ते सप्टेंबर १९९५ उच्च व तंत्रशिक्षण खात्याचे मंत्री; सप्टेंबर १९९५ ते जून १९९७ वित्त आणि नियोजन खात्याचे मंत्री; जून १९९७ ते ऑक्टोबर १९९९ पाटबंधारे, लाभक्षेत्र विकास खात्याचे मंत्री; राष्ट्रकूल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे २०००-२००१ चा उत्कृष्ट भाषण पुरस्कार प्राप्त; ऑक्टोबर २००९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; ११ नोव्हेंबर २००९ रोजी महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपदी निवड.

**छंद** : शेती.

**परदेश प्रवास** : अमेरिका, स्वित्झरलँड, नेदरलँड, इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, बेल्जियम, इटली, ग्रिस, ब्राझील, मॉरिशस,

संयुक्त अरब अमिरात, मेक्सिको, ऑस्ट्रिया, सिंगापूर, चीन, नेपाळ.

(१) जागतिक मराठी संमेलन, नेदरलँड येथे उपस्थिती;

(२) भारत सरकारच्या आयोजित ब्राझिल देशातील साखर कारखाने व इथेनॉल प्रकल्पाच्या अभ्यास दौऱ्यात सहभागी;

(३) जागतिक पर्यावरण बदल, जागतिकीकरण व आंतरराष्ट्रीय सुरक्षा - २१ व्या शतकातील नवी आव्हाने या कार्यक्रमात बॉन, जर्मनी येथे सहभाग;

(४) मेक्सिको येथे झालेल्या चौथ्या जागतिक जल परिषदेत सहभाग;

(५) जागतिक नागरिक परिषदेमध्ये ग्लासगो, ब्रिटन येथे सहभाग;

(६) जी-८ समूह राष्ट्र व युनेस्को आयोजित शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक परिषद, त्रिएस्ते इटली येथे सहभाग;

(७) लोकशाही व्यवस्थेत नागरिकांचा सहभाग या विषयावर एडिनबरो, इंग्लंड येथे स्कॉटिश संसदेत आयोजित केलेल्या चर्चासत्रात सहभाग;

(८) नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन या विषयावर डावोस, स्वित्झरलँड येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय आपत्ती निवारण कार्यक्रमात सहभाग;

**पत्ता** :

(१) विरोधी पक्षनेता,
महाराष्ट्र विधानसभा, विधान भवन,
मुंबई - ४०००३२.
दूरध्वनी : २२०२४२६२, २२०४१७०२

(२) ब-४, शासकीय कुटीर, मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी : २२८२०४८८, २२८२०३९९

(३) मु. पो. कोथळी, तालुका मुक्ताईनगर,
जिल्हा जळगाव. ४२५ ३०६
दूरध्वनी : (०२५८३) २२२३४५.